# “ स्त्री–पुरुष–तुलना ”

## ताराबाई शिंदे यांच्या पुस्तकातील काही उतारे

* आलीकडे सर्व वर्तमानपत्रात गरीब अबलांच्या दुष्कृत्यांविषयी बरेच छापून येते, तरी हा महाअनर्थ मिटवून टाकण्यास तुम्ही कोणीच पुढे होत नाही याचे कारण काय बरें ?

अहो, पुनर्विवाह न करण्याची चाल महान रोगांप्रमाणे अनेक ठिकाणी व जातीत पसरली आहे त्यामुळे किती लाखो व कोटयावधी स्त्रिया वैधव्याचे असह्य दुःख कसकसे भोगीत असतील व भोगितात व त्यापासून कसकसे अनर्थ होत आहेत व असतील याची कल्पनासुद्धा करिता येत नाही.

अरे नवऱ्याआधी बायकोने मरावे किंवा नवऱ्याने बायकोआधी मरावे याचा तुमच्या बापदादानी देवापासून काही दाखला आणला काय रे ? हा ईश्वराघरचा मळा. त्याला या स्त्रियानी काय करावे ? पतिराज एकदा स्वर्गवासी झाले म्हणजे य. बाईसाहेबांचे हाल कुत्रे खात नाहीत. त्यांचा कपाळी मग काय ? माथ्यावरील एकदा सर्व केस कुरळे केसावर नापिकाचा हात फिरला म्हणजे तुमचे डोळे थंड झाले. सर्व अलंकार गेले, सुंदरपण गेले. तिला कोठे लग्न कार्यात, समारंभात जेथ काही सौभाग्यकारक असेल तेथे जाण्याची बंदी. ती बंदी का ? तर तिचा नवरा मेला, ती अभागी, करंटचा कपाळाची. पण तो तिने का मारिला? त्याची आयुष्य मर्यादा संपली, बाजार झाला. त्याचा दोष बायकोकडे कशाकरिता ? बरे तेही असो, कबूल. जसे नवऱ्यामागे अगदी सर्व सृष्टि व्यापार सोडून ‘हरी हरी देव देव’ करीत बसावे तसे पुरुषाने का बसू नये बरे ? त्यानेच का दुसरे लग्न करुन नांदावे ? जसे एकदा सौभाग्य गेले म्हणजे स्त्रियांनी आपली तोंडे अगदी एखाद्या महान खुन्यापेक्षाही महाजबर अपराध्याप्रमाणे काळी करुन सर्व आयुष्यभर आंधार कोटडीत राहावे, त्याप्रमाणे तुमच्या बायका मेल्या म्हणजे तुम्हीही आपल तोंड काळे करुन दाढ्या मिशा भादरुन यावत् जन्मपर्यंत कोठेही अरण्यवासात का राहू नये बरे ? एक बायको मेली की तिचे दहावे दिवशीच तुम्ही दुसरी करुन आणावी असा तुम्हाला कोणत्या देवाने दाखला दिला आहे तो दाखवा बरे. जशी स्त्री तसेच पुरुष. तुमच्यामध्ये मोठे अलौकिक गुण कोणते ?

* तुम्हीच स्त्रियांना दोषपात्र होण्यास कारणीभूत होता. ऐका; कित्येक बाप आपल्या नक्षत्रासारख्या दहा अकरा वर्षाच्या मुली ऐशी नव्वद वर्षांचे श्रीमंत म्हाताऱ्यास रुपयांची थैली घेऊन व त्याचे श्रीमंतीवर नजर देऊन, वाघाला जशी बकरी द्यावी त्याप्रमाणे बेधडक देतात. कोणी सवतीवर मुली देतात. पण सवतीसारखे स्त्रियास निरंतर काटयांप्रमाणे सलणारे दुसरे शस्त्रच नाही. लग्नाची म्हणा अगर ठेवलेली म्हणा बाहेर अगर घरात जर ठेवील तर ते तिला कसे सहन होईल बरे ? तुमच्यातून कोणा एकाचे बायकोने त्याच्या देखत दुसऱ्या पुरुषाकडे जरा रोखाने पाहिले की त्यांचा काय विस्तवाप्रमाणे संताप होतो. त्याकरता तिची जनात किती फजिती करिता, तिला मारहाण किती होते, तिजवर जप्ती किती असते. तसे तुम्हाला का नसावे ?

कोणाला लेकी फार असल्यामुळे आल्या वरास देतो. मग तो कसा का असेना ? कोणी धादांत कुलांगारास दृष्टीने पहात असताही तेथेच मुलीला लोटितो. कोठे नवरा कुरुप, दुर्गुणी, हीनवर व अतिशाय जाच, हाणमार फार जप्ती, खाण्यापिण्याचे हाल अशा अनेक आपेष्टा करणारा असला तरी त्याच्या स्वाधीन कसाब्याच्या हाती गायीप्रमाणे कोणी आपल्या मुली करितात. या अशा कारणामुळे जर स्त्रिया निघून गेल्या तर दोष कोणचा? त्या बापाचा का लेकीचा ?

तुम्हाला जशी वाईट, कुरुप, दुर्गणी, घाणेरी, गावंढळ बायको आवडत नाही तसा बायकोला तरी या मासल्याचा नवरा आवडेल का? जशी तुम्हाला बायको चांगली पाहिजे तसा तिला चांगला नवरा नको का ?

(पृ. २०, २१, २२)

* दुर्गुणांची उत्पत्ती आधी आपले पासूनच झाली. प्रथम स्वधर्म सोडून मन मानेल तसे वर्तन करणे, दारु पिऊन रस्त्यात लोळणे, जुवा खेळणे, गांजा वगैरे ओढणे, रांडा ठेवणे इत्यादी वाईट घाणेरडी आचरणे तुम्ही करु लागला. आता रांडा कोण ? यांची काही सृष्टिविरहित उत्पत्ती झाली का ? का ह्या कोणी दुसऱ्या देवाने केल्या ? रांडा या तुम्हीच फसवून घराबाहेर